# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-7 | July - 2025


Original Article

# भारतातील बेरोजगारीची करणे स्वरूप व उपाय


**डॉ. भुरके नागोराव संभाजी**

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, महिला महाविद्यालय,सोलापूर

**Email:** nagoraobhurke55@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2025-170752

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 7|

Pp. 270-275

July 2025

**Submitted:** 20 June. 2025

**Revised:** 30 June. 2025

**Accepted:** 15 July. 2025

**Published:** 31 July. 2025



***सारांश :***

*भारतामध्ये बेरोजगारी ही एक गंभीर आणि बहुआयामी समस्या आहे. केवळ खुली बेरोजगारीच नव्हे तर अर्धबेरोजगारी, छुपी बेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुशिक्षित व महिलांमधील बेरोजगारी यांचेही प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. ग्रामीण भागात ही समस्या अधिक तीव्र आहे. बेरोजगारीची मुख्य कारणे म्हणजे लोकसंख्येचा विस्फोट, ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास, शेतीच्या अल्प भूखंडीकरणामुळे अपुरा रोजगार, अपुरा जलसिंचन, कर्जबाजारीपणा, अशिक्षण, भांडवलाचा अभाव, आणि गतिहीनता.या समस्येवर उपाय म्हणून लोकसंख्या नियंत्रण, श्रमप्रधान तंत्राचा अवलंब, जलसिंचनाचा विकास, ग्रामीण कुटीर उद्योगांना प्रोत्साहन, व्यावसायिक शिक्षण पद्धतीचा अवलंब, महिलांना रोजगार संधी, आणि विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी हे उपाय सुचवले आहेत. सरकारने रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना (IRDP), TRYSEM, व पंतप्रधान रोजगार योजना अशा विविध योजनांद्वारे बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत, बेरोजगारी कमी करण्यासाठी केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक, आणि तांत्रिक उपायांची आवश्यकता आहे. योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभाग हे या समस्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी अत्यावश्यक आहेत.*



***मुख्य शब्द*** *-बेरोजगारी, भारत, ग्रामीण विकास, अर्धबेरोजगारी, छुपी बेरोजगारी, सुशिक्षित बेरोजगार, लोकसंख्या वाढ, शेती, कुटीर उद्योग, जलसिंचन, रोजगार हमी योजना, व्यावसायिक शिक्षण, महिला रोजगार, स्वयंरोजगार, सरकारी योजना.*


## प्रास्ताविक

बेरोजगारीचां प्रश्न हा कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून महत्वाचा प्रश्न असतो. जगातील सर्वच देशांत बेरोजगारीचे प्रमाण कमी अधिक प्रमाणात आढळून येते. अमेरिका, जर्मनी यासारख्या प्रगत देशातही बेकारी आढळते. परंतु भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात बेकारीचा प्रश्न फारच गंभीर स्वरुपाचा असल्याचे दिसून येते. बेरोजगारीच्या प्रश्नामुळे देशातील आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती बिघडून देशात अस्थिरता निर्माण होते. भारतातील बेरोजगारीच्या प्रश्नाबाबत माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी हा प्रश्न 'स्फोटक प्रश्न' बनल्याचे उद्गार काढले होते. भारतात फक्त खुली बेरोजगारीच दिसून येत नाही तर त्याबरोबरच अर्धबेरोजगारी आणि छुपी बेरोजगारीही मोठ्या प्रमाणावर आढळून येते. बेरोजगारीमुळे देशातील श्रमशक्ती मोठ्या प्रमाणात वाया जाते. ती व्यक्तींच्या आणि समाजाच्या दृष्टीने गंभीर परिस्थिती असते.बेरोजगारीची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी 'पूर्ण रोजगार' ही संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. अर्थशास्त्रात पिगूच्या मते, "कोणत्याही राष्ट्रात काम करण्याची क्षमता असलेल्या सर्व लोकांना, त्यांची इच्छा असल्यास चालू वेतनदरावर कामधंदा मिळत असल्यास त्या राष्ट्रात पूर्ण रोजगाराची स्थिती आहे असे म्हणता येईल".


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/



**Address for correspondence:**

*डॉ. भुरके नागोराव संभाजी, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, महिला महाविद्यालय,सोलापूर*



**How to cite this article:**

*संभाजी,. भुरके. नागोराव. (2025). भारतातील बेरोजगारीची करणे स्वरूप व उपाय. Journal of Research & Development, 17(7), 270–275.* https://doi.org/10.5281/zenodo.16931422

DOI:10.5281/zenodo.16931422

OPEN ACCESS

तर समाजवादी विचारवंत सर विल्यम बेव्हरीजच्या मते, "पूर्ण रोजगार" म्हणजे नेहमी काम करु इच्छिणाऱ्या माणसांपेक्षा मोकळ्या व्यवसायाची संख्या जास्त असणे होय." बेरोजगारीची संकल्पना सर्वसामान्यपणे पुढीलप्रमाणे मांडता येईल - "प्रचलित वेतनदरावर काम करण्याची ज्यांची इच्छा असते व ते काम करण्यास शारीरिक व बौद्धिक दृष्टीने समर्थ असतात अशा लोकांना काम करण्याची व उत्पन्न मिळविण्याची मुळीच संधी मिळत नाही त्यांना बेरोजगार म्हटले जाते".बेरोजगारीच्या संकल्पनेचा अर्थ लावतांना काही बाबी विचारात घ्याव्या लागतात. देशातील आजारी, अपंग, अधू, वृद्ध अशा लोकांना बेकार म्हणता येणार नाही कारण त्यांची इच्छा असूनही क्षमतेअभावी काम करता येत नाही. तसेच घरकाम करणाऱ्या गृहिणी काम करतात पण त्यांना त्याबद्दल वेतन मिळत नाही. देशात सर्वत्र भिकारी, सेत, फकीर बेकार दिसतात पण त्यांना अर्थशास्त्रीय भाषेत बेकार म्हणता येणार नाही. कारण या लोकांत काम करण्याची क्षमता असते पण काम करण्याची इच्छा नसते. बोडक्यात मानसिक व शारीरिक काम करण्यास समर्थ नसलेल्या व्यक्तिलाही बेकार म्हणता येणार नाही.बेरोजगारीची आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे "काम करण्याची इच्छा व सामर्थ्य असूनही प्रचलित वेतनदरावर कामाच्या शोधात असूनही ज्यांना काम मिळत नाही अशा सर्वांचा समावेश बेरोजगारीच्या संकल्पनेत केला पाहिजे."

**बेरोजगारीचे प्रकार -**

बेरोजगारीचे स्वरुप स्पष्ट करत असताना तिचे प्रकार स्पष्ट करणे आवश्यक ठरते. अविकसित देशातील विशेषतः भारतातील बेरोजगारीचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे -

१) उघड स्वरुपातील किंवा खुली बेरोजगारी
२) सुप्त किंवा छुपी बेरोजगारी
३) अर्ध किंवा न्यून बेरोजगारी
४) हंगामी बेरोजगारी
५) सुशिक्षितांमधील बेरोजगारी
६) स्त्रियांची बेरोजगारी
७) ग्रामीण आणि शहरी बेरोजगारी

या प्रकाराबरोबरच चक्रीय बेरोजगारी, तांत्रिक बेरोजगारी, घर्षणात्मक बेरोजगारी, ऐच्छिक आणि अनैच्छिक बेरोजगारी इ. अनेक प्रकारची बेरोजगारी दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेत अद्यापही शेती क्षेत्राचे प्राबल्य असल्यामुळे सुमार ६५% लोकांना शेती क्षेत्रातूनच रोजगार उपलब्ध होतो. मान्सूनची अनिश्चितता, पाणीपुरवठ्याच्या सोयींचा अभाव यामुळे शेती क्षेत्रात हंगामी आणि अर्थ बेरोजगारांचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून येते. वाढत्या लोकसंख्येचा भार शेतीक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात पडत असल्यामुळे या क्षेत्रात छुपी बेकारीही फारच आढळते. अलिकडे सुशिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाणही वाढत असल्याचे दिसून येते.

**बेरोजगारांची कारणे -**

विकसित राष्ट्रातील बेरोजगार प्रामुख्याने प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आढळून येतो तर भारतातील बेरोजगार प्रामुख्याने भांडवलाची कमतरता व नैसर्गिक साधनांचा अपुरा वापर असे दिसून येते. भारतात ग्रामीण भागात बेरोजगाराची तीव्रता अधिक आढळून येते. ग्रामीण बेरोजगार साधारणतः खुल्या, छुपा/प्रच्छन्न आणि हंगामी बेरोजगार अशा प्रकारचा दिसून येतो. ग्रामीण बेरोजगारांची कारणे सांगितली जातात. त्यातील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे.

**१) लोकसंख्या वाढ -**

ग्रामीण भागात लोकसंख्या वाढीचे प्रमाण अधिक आहे. लोकसंख्या वाढीची कारणे व दुष्परिणाम अनेक असूनदेखील त्यांची जाणीव खेडेगावातील लोकांना योग्य प्रमाणात झालेली नाही. म्हणून उत्पादन वाढ झाली तरी वाढते उत्पादन वाढती लोकसंख्या गिळंकृत करते व आर्थिक विकासाचा दर घटतो. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत एकूण उत्पादन वाढीच्या दरामध्ये लोकसंख्यावाढीचा दर अधिक असल्याचे सिद्ध झाले आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-7 | July - 2025

**३) ग्रामीण उद्योगांचा -हास -**

एकेकाळी भारत लघु व कुटीर व्यवसाय तसेच हस्तकला व्यवसाय यासाठी जगात प्रसिद्ध होता. परंतु आधुनिकतेच्या नावाखाली तसेच कुशल कारागिरांच्या कमतरतेमुळे पारंपारिक हस्तकला व्यवसाय नाहिसे होत आले आहेत. तसेच त्यांना आधुनिक, उत्पादनाशी स्पर्धा करावी लागत आहे. उत्पादनाचे लहान प्रमाण, कुशलता आणि कालावधीचा विचार करता या उद्योगाचा उत्पादन खर्च जास्त येतो म्हणून किंमत कमी ठेवता येत नाही. परिणामी मागणी घटते व उत्पादन बंद करावे लागते. ग्रामीण भागात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मच्छिमारी इ. व्यवसाय आढळतात. परंतु अयोग्य व्यवस्थापन, अपुरा भांडवल पुरवठा, प्रशिक्षणाची गैरसोय इ. अनेक कारणांमुळे या पुरक व्यवसायाची प्रगती योग्य प्रमाणात झाली नाही.

**४) शेतीचा आकार –**

शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरणामुळे आकारमान दिवसेंदिवस घटत आहे. २.५ हेक्टर एवढे सरासरी क्षेत्र भारतात आढळते. परंतु दोन्ही किनारपट्टीच्या भागात लागवडी योग्य क्षेत्राचा आकार इतका लहान असतो की वर्षभर पूर्ण वेळ शेतीक्षेत्रात रोजगार/कामधंदा उपलब्ध असूच शकत नाही. म्हणून अर्धवेळ कामधंदा करुन तो रोजगारांच्या शोधात मुंबई, कलकत्ता, दिल्ली, चेन्नई इ. औद्योगिक शहरात जातो. तिथेही त्याला वर्षभर पूर्ण वेळ काम/रोजगार करता येत नाही. कारण शेतीच्या हंगामात त्याला पुन्हा गावाकडे यावे लागते. अशा तऱ्हेने दोन्हीकडेही तो पूर्ण क्षमतेने उत्पादन प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाही. परिणामी उत्पादन घटते, आर्थिक विकास घटतो.

**५) ग्रामीण कर्जबाजारीपणा व अशिक्षित शेतकरी -**

ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्ति कर्जबाजारी असल्याचे "अखिल भारतीय ग्रामीण पतपहाणी समितीच्या" अहवालात नमूद केलेच आहे. या कर्जात दिवसेंदिवस वाढच होत असल्याचे आढळते. कर्ज व्यापारी बँका, भू-विकास बँका किंवा नाबार्ड कडून घेण्याऐवजी ग्रामीण भागातील सावकार व सराफी पेढीवाले यांच्याकडूनच कर्ज घेतलेले आढळून येते. त्याचे कारण असेही आहे की, अजूनही ७०% लोक अशिक्षित आहेत. त्यांना लिहिता वाचता येत नसल्याने बँकाचे कर्ज मागणी फॉर्म भरणे इतर कागदपत्रांची पूर्तता करणे हे जमत नाही. सावकार मात्र त्यांच्या अडाणीपणाचा/अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक करतात. कर्जबाजारी असल्यामुळे शेतीतील उत्पादन अभावामुळे कर्जफेड करता येणे शक्य नाही. अशा परिस्थितीत गतवर्षी, आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले आहे.

**६) खेळत्या भांडवलाचा तुटवडा -**

भारतात एकूणच सर्वक्षेत्रात भांडवल गुंतवणूक फार कमी आहे. एकूण (GNP) उत्पादनाच्या २०% देखील भांडवल गुंतवणूक होत नाही. मुळात भांडवल संचय कमी आहे. म्हणूनच प्रत्येक राज्य सरकार व केंद्र सरकार देखील अनिवासी भारतीयांना भारतात भांडवल गुंतवणूक करण्यास प्रेरित/प्रोत्साहित करीत आहे. त्यातही औद्योगिक क्षेत्रापेक्षा शेती क्षेत्रात व एकूणच ग्रामीण भागात खेळत्या भांडवलाची कमतरता भासते. कारण शेती क्षेत्रातून उत्पादन। पावसाच्या लहरीपणामुळे ग्रामीण भागातील शेती बरोबर अन्य क्षेत्रांचे प्रचंड नुकसान दन निश्चित मिळू शकत नाही. शेती पावसावर अवलंबून असल्याने होते. आजही उत्तरप्रदेश, आसाम, बिहार, बंगाल या राज्यात अतिवृष्टीमचेण ६०,००,००० लोक बेघर झाले आहेत. उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील ५०% गावे त्यांची जमीन, जनावरे, व्यवसाय वाहून गेले. एवढेच नव्हे तर पुरामुळे रेल्वे, रस्ते यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. म्हणून ग्रामीण भागात भांडवल गुंतवणूक किंवा खेळते भांडवल सहज उपलब्ध होत नाही.

**७) गतिहीन कामगार -**

ग्रामीण भागातील कामगारांच्यात गतिशीलता आढळत नाही. पारंपारिक पद्धतीने एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जेवढे जुजबी ज्ञान आणि कौशल्य दिले जाते तेवढ्यावरच ग्रामीण व्यवसाय चालवले जातात. शहरात जावून आपल्या व्यवसायाच्या बाबतीत अत्याधुनिक शिक्षण व प्रशिक्षण घेण्यास ग्रामीण भागातील लोक उत्सुक नसतात. शेती क्षेत्रात तर गतिहीनतेमुळे छुपी बेकारी आढळून येते. ग्रामीण कामगारांच्यात गतिशीलता नसल्याचे आढळून येते. कारण एकत्र कुटुंब पद्धती, अंधश्रद्धा, अशिक्षितपणा, सामाजिक व

सांस्कृतिक दृष्टीकोन इ. मुळे ग्रामीण तरुण गाव सोडून रोजगारासाठी इतर ठिकाणी जाण्यास तयार नसतो. तो गावातच राहून बेकार राहण्याचे पसंद करतो.

**८) जलसिंचन सुविधांचा अभाव -**

एकूण लागवडीच्या क्षेत्रापैकी फक्त २०% क्षेत्र ओलिताखाली असल्याचे आढळते. भारतात सिंचन सुविधा उदा. धरणे, कालवे, विहिरी, तलाव इत्यादींचा तुटवडा आहे. तसेच अत्याधुनिक पद्धतीचा उदा. ठिबकसिंचन, स्प्रिंकलर इ. वापर करून अधिकाधिक क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा दृष्टीकोनही आढळत नाही. ८०% जमिन ही निसर्गावर /पावसावर अवलंबून असल्यामुळे या जमिनीतून किंवा या लागवडीयोग्य क्षेत्रातून वर्षभर उत्पादन घेता येत नाही. वर्षातील काही काळच उत्पादन घेतले जाते त्यामुळे काहीकाळच रोजगार उपलब्ध होतो. जेव्हा पाऊस नसतो उदा. उन्हाळ्यात तेव्हा बेरोजगारीची अवस्था असते. याउलट २०% ओलिताखालील क्षेत्रात मात्र वर्षातून २ ते ३ पीके घेतली जातात. वर्षभर रोजगाराची उपलब्धता राहते. भारतात तर काही प्रदेश आणि भूभाग पर्जन्यछायेचा असल्याने तेथे वर्षात ८०% से. मी. सुद्धा पाऊस पड्त शकत नाही. उदा. राजस्थान त्यामुळे या भागात बेरोजगार तीव्रतेने आढळतो

**भारतातील बेरोजगारीवरील उपाय :**

**१) लोकसंख्या वाढ नियंत्रित करणे -**

भारत सरकारने लोकसंख्यावाढ नियंत्रित करण्यासाठी कुटुंब नियोजन कार्यक्रमावर भरीव खर्च केलेला आहे. पण तरीही प्रतिवर्षी १.५ कोटी एवढी लोकसंख्येत वाढ होत आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार १९७१ नंतरच्या २० वर्षात देशातील १५ वर्षाखालील मुलांची संख्या दुपटीने वाढली आहे. ही लोकसंख्यावाढ अशाच पद्धतीने होत राहिल्यास, बेरोजगारीचा प्रश्न अधिक उग्र रुप धारण करेल. म्हणून भारताने "एक कुटुंब - एक मूल" या चीनमधील लोकसंख्या वाढ कमी करण्याच्या धोरणाचा 'अवलंब करणे गरजेचे आहे. तसेच नोकरीमध्येही एक अपत्य असणारांना प्राधान्य दिले पाहिजे.

**२) औद्योगिकरणात श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब -**

देशातील वाढत्या श्रमशक्तीला रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी औद्योगीकरणाची गती वाढविली पाहिजे व त्याबरोबरच त्या प्रक्रीयेत शक्यतो श्रमप्रधान तंत्रांचा वाढत्या प्रमाणात वापर करणे आवश्यक आहे. तसेच भारतात बऱ्याच उद्योगात सुमारे २० ते २५ टक्के उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर केल्यास रोजगारात वाढ करणे शक्य आहे. या गोष्टीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**३) शेतीसाठी पाणीपुरवठा -**

लागवडीखालील शेतीक्षेत्रापैकी अद्यापही ७०% क्षेत्र पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे देशात शेती क्षेत्रात हंगामी व अर्धबेरोजगारीचे प्रमाण खूपच आहे. ती कमी करण्यासाठी ठिकठिकाणी पाण्याचा उतार व योग्य ठिकाण पाहून नाला बंडिंग, पाझर तलाव उभारले पाहिजेत व पाणी अडवून बारमाही बागायत शेती करण्याचा प्रयत्न सरकार बरोबरच गावच्या लोकांचे प्रयत्न अपेक्षित आहेत. तसेच मोठी धरणे बांधून कॅनॉल्सच्या सहाय्याने शेतीला पाणीपुरवठा केल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात शेती क्षेत्रात आणखी रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

**४) ग्रामीण भागात लघु आणि कुटीर उद्योगधंद्यांचा विकास -**

ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसामुग्री लक्षात घेऊन श्रमप्रधान तंत्राचा अवलंब करणाऱ्या लघु आणि कुटीर उद्योगांना अनेक सोई-सुविधा उपलब्ध करुन देऊन प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यामध्ये शेतमालाशी संबंधित विविध प्रक्रिया उद्योगांचा विशेषतः फळे - भाजीप्रक्रिया संस्था उभारुन रोजगारात बऱ्याच प्रमाणात वाढ करता येते.

**५) रोजगाराभिमूख व्यावसायिक शिक्षण पद्धतीचा अवलंब –**

सध्याच्या शिक्षण पद्धतीमुळे शिक्षण घेणारांना नोकऱ्या मिळतीलच अशी खात्री नाही. त्यामुळे या शिक्षण पद्धतीत परिवर्तन घडवून आणून रोजगाराभिमूख अशा व्यावसायिक शिक्षण पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. या शिक्षणपद्धतीमुळे शेतीसह इतर सर्वच क्षेत्रात रोजगार मिळण्यास अडचण येऊ नये,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-7 | July - 2025

**६) स्त्रियांच्यामधील रोजगार वाढविणे -**

स्त्रियांची श्रमशक्ती वाया जाऊ नये म्हणून त्यांच्यासाठी वेगळ्या कार्यक्रमांची आखणी करुन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी रेशीम उत्पादन. कुक्कुटपालन. मेष व शेळी पालन असे उद्योग करण्यास प्रेरणा व आर्थिक सहाय्य दिले पाहिजे. त्याबरोबरच नागरी भागात शिवणकाम, झेरॉक्स व टाईपींग मशिन्स, खाण्याचे पदार्थ तयार करणे, पापड-लोणची तयार करणे, कातडी बॅगा शिवणे यासारख्या उद्योगांचे मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य करणे आवश्यक ठरेल.

**७) विविध सरकारी कार्यक्रम -**

बेरोजगारी आणि दारिद्र्य नष्ट करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारनी अनेक कार्यक्रम अंमलात आणले आहेत. त्यातील कांही महत्वाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे

**अ.रोजगार हमी योजना**

बेरोजगारी आणि दारिद्र्य कमी करण्यासाठी १९७२ पासून महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजनेचा अवलंब केला आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील ग्रामीण भागात व 'क' वर्ग नगरपरिषदांच्या क्षेत्रात ज्यांना रोजगाराची जरुरी आहे व जे शारीरिक श्रमाचे काम करण्यास तयार आहेत त्यांना " मागेल त्यांना काम" या तत्त्वाच्या अधीन राहून लाभदायक व उत्पादक रोजगार पुरविणे हा आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात रस्ते तयार करणे, गाव तळी बांधणे, डोंगरउतारावर झाडी लावणे. विहिरी खणणे, मृदसंधारण, फलोत्पादन विकास कार्यक्रम यासारखी कामे हाती घेतली जातात. त्यामुळे शेतकरी आणि शेतमजूरांची बेकारी व अर्धबेकारी कमी होण्यास बरीच मदत झाली आहे. सन १९९६-९७ या वर्षात ९ कोटी मनुष्यदिवसांचे काम या योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आले. गुजरात सरकारने 'रोजगार हक्क' या नावाने अशीच एक योजना तयार केली आहे.

**ब) जवाहर रोजगार योजना**

जवाहर रोजगार योजनेची सुरवात १ एप्रिल १९८९ पासून करण्यात आली. या योजनेचा मुख्य हेतू ग्रामीण भागातील बेरोजगारांना लाभदायी रोजगार मिळवून देणे हा आहे. टिकाऊ आणि उत्पादक सामूहिक मालमत्ता निर्माण करुन ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे हाही उद्देश आहे. या योजनेकरिता केंद्रशासन ८०% व राज्य शासन २०% या प्रमाणात वित्त पुरवठा करतात. या योजनेअंतर्गत निर्माण होणाऱ्या एकूण रोजगारांपैकी ३०% रोजगार स्त्रियांना पुरविण्याची अट आहे. या योजनेच्या सुरवातीपासून ते मार्च १९९६ पर्यंत २३०३३ कोटी रु. खर्च करण्यात आले. तर याच काळात ६२०.४ कोटी दिवस रोजगार या योजनेतून निर्माण झाला. १९९७-९८ मध्ये, जानेवारी १९९८ पर्यंत पुरविण्यात आलेल्या रोजगारापैकी ३४% रोजगार स्त्रियांना पुरविण्यात आला.

**क) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP)**

हा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९८० पासून संपूर्ण देशभर राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील गरीब कुटुंबाना त्यांचे दारिद्र्य कमी करण्यासाठी स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी अर्थपुरवठा करणे. मदत अनुदानाच्या स्वरुपात दिली जाते. हे अर्थसहाय्य प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातील ग्रामीण भागामधील रोजगार वाढून लोकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केले जाते. या कार्यक्रमासाठीचा आर्थिक भार ५०% केंद्रशासन व ५०% राज्यशासन यांनी उचललेला आहे. या कार्यक्रमा अंतर्गत गेल्या दिड शतकात (१९८०-८१ ते १९९५-९६) सुमारे २५००० कोटी रु. एकूण गुंतवणूक करण्यात आली असून ४.९ कोटी ग्रामीण कुटुंबाना त्यामुळे मदत मिळाली आहे. ही मदत दुभत्या गाई-म्हैशी खरेदी करणे, शिलाई मशीन खरेदी करणे, भुसार माल दुकान, कापड दुकान, स्टॉल चालविणे इ. अनेक स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्या बाबींसाठी दिली जाते.

**ख) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरुणांना प्रशिक्षण** (TRYSEM) ट्रायसेम ही याजेना झाली आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील १८ ते २५ 'आय. आर. डी. पी' ला पूरक असून तिची सुरवात १५ ऑगस्ट १९७९ पासून साध्य करणे श वयोगटातील तरुणांना तांत्रिक आणि संयोजकीय कौशल्याचे शिक्षण देऊन त्यांची बेरोजगारी कमी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमात स्त्रियांसाठी ४०% संधी उपलब्ध करण्याची अपेक्षा आहे.इ) पंतप्रधानांची रोजगार योजना ही योजना ग्रामीण आणि शहरी भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी राबविण्यात आली आहे. या योजनेनुसार ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २४ हजारापेक्षा अधिक नाही व जी व्यक्ती १० वी पास अथवा नापास, आय.टी.आय. उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेचा ६

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-7 | July - 2025

महिन्यांचा तांत्रिक शिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण आहे अशी १८ ते ३५ वयोगटातील व्यक्ती अनुदान मिळण्यास पात्र ठरतात. १ लाख रुपयापर्यंतच्या प्रकल्पाचा या योजनेत समावेश आहे. या वर उल्लेख केलेल्या योजनांबरोबरच इतर अनेक योजना रोजगार निर्माण करुन लोकांचे दारिद्य कमी करण्यासाठी राबविल्या जात आहेत.

**ग) रोजगार उपलब्धता -**

भारतातील रोजगार १९७२-७३ ते १९८७-८८ या कालावधीत प्रतिवर्षी २.२ टक्के दराने वाढला तर आर्थिक वाढीचा दर ग्रामीण आणि नागरी भागात अनुक्रमे प्रतिवर्षी १.७५% व ४% एवढा होता. याच कालावधीत प्राथमिक क्षेत्रातील रोजगार बाढीचा दर प्रतिवर्षी १.३७% तर द्वितीय व तृतीय क्षेत्रात अनुक्रमे ३.५% व ५% होता. भारतात शेतीमध्ये ६६% रोजगार निर्माण होतो तर कारखानदारी ११%, सेवा ८%, व्यापार ७%, बांधकाम ३%, वाहतूक २.५% व खाण, वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि वित्त इत्यादीमध्ये २.५% रोजगार निर्माण होतो. १९८७-८८ मध्ये पूर्ण झालेल्या १५ वर्षात सार्वजनिक क्षेत्रात प्रतिवर्षी ३% दराने तर खाजगी क्षेत्रात ०.५% दराने रोजगारात वाढ झाली. याच काळात स्वयंरोजगार टक्केवारी ६१.५% वरुन ५६.३% पर्यंत घटली. संघटित क्षेत्रातील रोजगार वाढीचा दरही २.५% बरुन १.४% पर्यंत घटलेला दिसून येतो. या रोजगार घटीचे महत्वाचे कारण म्हणजे आजारी संस्थांना त्या बंद करण्यास दिलेली परवानगी व सरकारच्या निर्यात धोरणानुसार योग्य श्रम-भांडवल रचनेसाठी अनेक संस्थांतील कामगार कपात होय.

**घ) भविष्यकालीन रोजगाराची अपेक्षा-**

सन १९९५ ते २००० या कालावधीत श्रमाचा पुरवठा करणाऱ्यांची संख्या ४.१ कोटी पर्यंत वाढली. या वाढीव श्रमपुरवठा करणारास प्रतिवर्षी ४% दराने रोजगार वाढीचा दर ठेवता आला तर पूर्ण रोजगारीचे उद्दिष्ट साध्य करता येईल. यासाठी भारताचे एकूण राष्ट्रीय उत्पादन प्रतिवर्षी १०% दराने वाढण्याची आवश्यकता9 आहे. पण आत्तापर्यंतचा रोजगार वाढीचा दर पाहिला तर असे दिसून येते की १९७० च्या दशकात असणारा प्रतिवर्षी ३% दर, १९८० च्या दशकात १.५% पर्यंत खाली आल्याने वरील उद्दिष्ट साध्य करणे शक्य होणार नाही असे वाटते. नियोजन मंडळाच्या अंदाजानुसार एकूण राष्ट्रीय उत्पादनातील प्रतिवर्षी ५.६% दराने होणाऱ्या वाढीने रोजगार निर्मिती प्रतिवर्षी २.६% दराने होऊ शकते. परंतु हा उत्पादन वाढीचा दर संपादन करणे आणि पर्यायाने वरील रोजगार दर गाठणे अवघड आहे. ८ व्या पंचवार्षिक योजनेत प्रतिवर्षी ८० ते ९० लाख लोकांना रोजगार निर्मिती आवश्यक होती पण १९९१-९२ मध्ये रोजगार निर्मिती फक्त ३० लाख झाली. १९९७ते २००२ या कालावधीतील रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट प्रतिवर्षी ९० ते १२० लाख एवढे आहे. पण १९५०-५९ पासूनची थकबाकीची स्थिती पाहिली तर वरील उद्दिष्ट साध्य करणे बरेच कठीण आहे.

**समारोप –**

भारतातील बेरोजगारीची स्थिती फारच गंभीर आहे. बेरोजगारीची तीव्रता कमी करण्यासाठी सर्वच क्षेत्रातील आणि उपक्षेत्रातील व्याप वाढवून आणि अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याबरोबरच बेरोजगारीच्या मुळाशी असलेली वाढती लोकसंख्या नियंत्रित करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विविध कार्यक्रम आणि उपाययोजनांची अंमलबजावणी केली पाहिजे.

**संदर्भ सूची -**

1. एस. महेंद्र देव - 'स्टेट इंटरव्हेन्शन्स अॅन्ड विमेन्स एम्प्लॉयमेंट', दि इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स, खंड-४० क्रमांक ३, जुलै-सप्टेंबर, १९९७,
2. रुदर दत्त आणि के. पी.एम्. सुंदरम् 'अनएम्प्लॉयमेंट इन इंडिया', इंडियन इकॉनॉमी,
3. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी १९९७-९८: अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई,
4. डॉ. राईस् अहमद - 'आय.आर.डी.पी. अॅन्ड इरॅडिकेशन ऑफ पॉव्हर्टी -१" "किसान वार्ड" जूलै-१९९८, खंड-२५ नं. ७,
5. श्रीवास्तव ओ. एस. 'एम्प्लॉयमेंट अॅन्ड अनएम्प्लॉयमेंट ट्रेन्ड इन इंडिया इंटर-स्टेट सिनारिओ' इंडियन इकॉनॉमी इन इंटर-रिजनल परस्पेक्टिव्ह, खंड-१ पॉइंटर पब्लिशर्स, जयपूर
6. पॉलिसी प्रोनाउन्समेन्ट : लेबर एम्प्लॉयमेन्ट अॅन्ड ट्रेनिंग १९९६-९७ अॅन मॅन पॉवर जर्नल, खंड-३३, क्रमांक ४ जानेवारी ओव्हरव्हयू, आय. ए. एम्. आर. मार्च १९९८.